# समाज के लिए गांधी के विचारों का हो प्रसार

## 'महात्मा गांधी और मराठी साहित्य' पर दो दिवसीय चर्चासत्र का आयोजन, विचारकों ने रखे मत

नागपुर | 15 सितंबर | लोकमत सेवा

'गांधी विचारधारा और मुस्लिम व आदिवासी साहित्य' विषय पर आयोजित चर्चासत्र में विचारकों ने एक साथ कहा है कि गांधी ने किसी एक समाज या एक देश के लिए ही कार्य नहीं किया बल्कि उनके विचार पूरी मानवता के लिए थे. उन्होंने धार्मिक आडंबर को दूर करने का प्रयास किया. ऐसे महात्मा के समतामूलक व तत्वनिष्ठ समाज बनाने के विचार को दूर-दूर तक पहुंचाया जाना चाहिए.

साहित्य अकादमी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के गांधी विचार विभाग द्वारा आयोजित दो दिवसीय चर्चासत्र का रविवार को समापन हुआ. रंगनाथ पठारे की अध्यक्षता में संपन्न 'गांधी विचारधारा और मुस्लिम व आदिवासी साहित्य' विषय पर आयोजित चर्चासत्र में जावेद पाशा कुरैशी व प्रभु राजगडकर उपस्थित रहे. जावेद पाशा ने कहा कि महात्मा गांधी और मुस्लिम मराठी साहित्य को समझने के लिए इतिहास की समीक्षा की आवश्यकता है. प्रभु राजगडकर ने कहा कि आदिवासी साहित्य में गांधी कहीं नजर नहीं आते लेकिन आदिवासियों के साहित्य में अहिंसा प्रकट होती है. बच्चों की ओर से सवाल किया जाता है कि गांधी ने आदिवासियों के लिए क्या किया, यह प्रश्न गौण है. गांधी ने संपूर्ण भारत के लिए कार्य किया, ये महत्वपूर्ण है. यह शोध का विषय है कि गांधी के विचार आदिवासियों तक क्यों नहीं पहुंचे. चंद्रकांत वानखडे की अध्यक्षता में संपन्न 'गांधी विचारधारा, दलित व स्त्रीवादी साहित्य' चर्चासत्र में डॉ. सुनील रामटेके ने डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी के विचारों में वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था पर प्रकाश डाला. उन्होंने कहा कि दोनों के कार्य राष्ट्रीय हित में होने के बावजूद केवल भ्रम की वजह से दोनों ही विचारधाराओं के अनुयायियों में काफी विरोधाभास दिखाई देता है. दलित साहित्य के प्रेरणास्रोत आंबेडकर रहे हैं. हालांकि इस साहित्य की रचना उनके बाद ही हुई.

राजन गवस की अध्यक्षता में 'महात्मा गांधी व बाल साहित्य' चर्चासत्र में लीला शिंदे व डॉ. मंगला वरखेडे ने विषय प्रस्तुत किया. दोनों ने ही अपेक्षा जताई कि महात्मा गांधी के बाल साहित्य से बालमन पर सकारात्मक परिणाम हो सकता है और भविष्य में इससे विवेकशील पीढ़ी का निर्माण हो सकता है.



चर्चा सत्र के दौरान विचार व्यक्त करते अतिथि.

लोकमत

संडे अँकर । सुरेश द्वादशीवार : 'महात्मा गांधी आणि मराठी साहित्य' द्विदिवसीय चर्चासत्राचे उद्घाटन

# महाराष्ट्रात गांधींना न्याय देणारा न्यायाधीश निपजला नाही

## नागपूर गांधी विचार आणि विरोधकांचे कुरुक्षेत्र -अभय बंग

नागपूर हे गांधी विचार आणि गांधीविरोधकांचे कुरुक्षेत्र आहे. या क्षेत्रावर ८० वर्षे गांधी विचाराच्या कॉंग्रेसचे वर्चस्व राहिले आणि आता गांधीचा विरोध करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गड असल्याचे प्रतिपादन अभय बंग यांनी केले. महाराष्ट्रातील वैचारिक आणि ललित वाङ्मय क्षेत्रात गांधी दिसत नाहीत. ढोबळमानाने मराठी लेखकांनी गांधींची सुरुवातीला उपेक्षा केली, मग उपहास केला, नंतर उग्र विरोध केला आणि सरतेशेवटी गांधींचा खून करुन मोकळे झाल्याची टीका बंग यांनी मराठी साहित्यिकांबाबत केली.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** मराठी विचारकांनी जेवढा अन्याय महात्मा गांधींवर केला, तेवढा अन्याय इतर कुठेही झालेला नाही. मार्क्सवाद, समाजवाद, हिंदुत्ववाद, आंबेडकरवाद आणि खुद्द गांधीवाद्यांच्या अवडंबरात अडकलेल्या गांधीविचारांना न्याय देण्याची किमया महाराष्ट्रातील लेखकांना साधता आली नाही. खरं सांगायचे तर महाराष्ट्रात गांधींना न्याय देणारा एकही न्यायाधीश आजवर निपजला नसल्याची व्यथा लोकमत नागपूरचे संपादक सुरेश द्वादशीवार यांनी आज येथे व्यक्त केली.

साहित्य अकादमी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभाग व गांधी विचारधारा विभागाच्यावतीने शंकरनगर येथील गांधीभवन येथे आयोजित 'महात्मा गांधी आणि मराठी साहित्य' या विषयावरील द्विदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटन सोहळ्यात बीजभाषण करताना द्वादशीवार यांनी वैचारिक विभागणी असलेल्या महाराष्ट्रातील लेखकांची महात्मा गांधी यांच्याबाबतीतल्या भूमिकेवर प्रकाश टाकला. यावेळी साहित्य अकादमी मुंबईचे प्रादेशिक सचिव कृष्णा किंबहुने, मराठी सल्लागार मंडळाचे संयोजक रंगनाथ पठारे, प्रसिद्ध संशोधक डॉ. अभय बंग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सिद्धार्थविनायक काणे, गांधी विचारधारा विभागप्रमुख प्रमोद वाटकर, डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित होते.



उद्घाटन सत्रात बोलताना अभय बंग, व्यासपीठावर कृष्णा किंबहुने, रंगनाथ पठारे, डॉ. सिद्धार्थविनायक काणे, प्रमोद वाटकर.

जगपातळीवरील सर्वच क्षेत्रात महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. सबंध गुजरातेतील साहित्यावर गांधींचा प्रभाव दिसून येतो. मात्र, गांधींना ओळखण्याचे जे सामर्थ्य लोकमान्य टिळकांमध्ये, विन्स्टन चर्चिलमध्ये म्हणा या अन्य पाश्चात्य जाणकारांमध्ये होते, ते सामर्थ्य महाराष्ट्रातील लेखकांमध्ये दिसून आले नसल्याची खंतही द्वादशीवार यांनी बोलून दाखविली. याला कारण म्हणजे, गांधींनी स्वतःचे विचार सूत्रबद्ध पद्धतीने कुठेच लिहून ठेवलेले नाही. माझे जीवन हीच माझी विचारपद्धती, असे त्यांचे म्हणणे होते. मार्क्सवादाचा पराभव गांधींनी लेनिनच्या हयातीतच केला.

कामगार व शेतकऱ्यांचा विचार प्रबळ करणारा मार्क्सवाद भारतातील कामगार व शेतकऱ्यांनी गांधी विचारांमुळे नाकारला. समाजवाद्यांनी हवा तेवढा गांधी मंजूर करून, इतर तत्त्वे नाकारली. हिंदुत्ववाद्यांनी गांधीला फाळणीस जबाबदार धरून, मुस्लिमप्रेम म्हणून गांधींचा विरोध केला. तर, आंबेडकरवाद्यांनी गोलमेज परिषदेमध्ये गांधींनी स्वतःला सबंध भारतीयांचा मी एकटाच प्रतिनिधी असल्याचे संबोधल्याने, गांधींचा विरोध केला. मात्र, एक कुटुंबप्रमुख म्हणून गांधींनी सगळ्यांना कुरवाळल्याचे द्वादशीवार म्हणाले.

लोकमान्य टिळकांनी स्वतः महात्मा गांधी यांना कॉंग्रेसचे पुढचे नेतृत्व म्हणून पुढे केले होते. मात्र, त्या काळातील लेखक सवर्णीय विशेषतः ब्राह्मण वर्गातील असल्याने, प्रारंभी ते लोकमान्य टिळक, नंतर सावरकर आणि पुढे संघाच्या प्रभावातच राहिले आणि गांधी आपसुकच नाकारल्या गेला. एकूणच गांधींना समजण्याच्या चक्रात ब्राह्मण, सावरकर आणि संघ अडथळा बनल्याचे ते म्हणाले. संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले, तर आभार प्रमोद वाटकर यांनी मानले.

## नुसते गांधी नको, शिवाजी आणि सावरकरही हवेत -सिद्धार्थविनायक काणे

गांधी एक स्वभावधर्म आहे आणि तो प्रत्येकातच वसतो. मात्र, नुसते गांधी होऊन चालणार नाही तर, कधी शिवाजी महाराज तर कधी सावरकरही व्हावे लागेल, अशी भावना डॉ. सिद्धार्थविनायक काणे यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केली. महाराष्ट्रातील लेखकांनी गांधींवर चिंतन केले नाही, असे म्हणणे चुकीचे असल्याचेही ते म्हणाले. गांधींबद्दल लिहिणे म्हणजे गांधी विचार आत्मसात केला, असे होत नाही... असे चिंतनही त्यांनी व्यक्त केले.

# मराठी साहित्यात महात्मा गांधींची उपेक्षाच

## डॉ. अभय बंग यांची खंत

**प्रतिनिधी, नागपूर**

भारतात महात्मा गांधी नावाचा एक महापुरुष होऊन गेला. परंतु मराठी साहित्यात त्यांच्या विविध पैलूंवर वैचारिक लेखनाचा अपवाद वगळता ललित व कादंबरी लेखन झाले नाही. एकप्रकारे मराठी साहित्यात महात्मा गांधींची उपेक्षाच झाली, अशी खंत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी व्यक्त केली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा मराठी विभाग, गांधी विचारधारा आणि साहित्य अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. सिद्धार्थ विनायक काणे, मराठी सल्लागार मंडळाचे संयोजक रंगनाथ पठारे, साहित्य अकादमी मुंबईचे प्रादेशिक सचिव कृष्णा किंबहुने, गांधी विचारधारा विभागाचे प्रमुख प्रमोद वाटकर, संयोजक डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित होते.

डॉ. बंग म्हणाले, खरे तर आपण महात्मा गांधी या विषयाकडे भावनिक हिंदोळ्यातून तटस्थपणे बघू शकलो पाहिजे. हा इतका मोठा महानायक कसा निर्माण झाला आहे याचा अभ्यास करण्याची व ते साहित्यातून समोर येण्याची गरज आहे. गांधी हे महानायक होते. ३५ वर्षात त्यांनी देशाचा चेहरा बदलून टाकला. मात्र मराठी साहित्य व गांधी याचा विचार करता साहित्यिकांचा प्रतिसाद मात्र अपुरा व पोरका दिसतो. मराठी साहित्यिकांनी सुरुवातीला गांधींची उपेक्षा केली. त्यानंतर उपहास व विरोध केला आणि शेवटी खून केला, असेही ते म्हणाले. कुलगुरू डॉ. काणे म्हणाले, वेगवेगळ्या परकीय भाषेतून महात्मा गांधीवर ५० पेक्षा अधिक पुस्तक लिहिली गेली आहेत. मात्र गांधींच्या वेगवेगळ्या पैलूंचा अभ्यास करुन ते साहित्यातून पोहचणे आवश्यक होते त्या प्रमाणात साहित्यनिर्मिती झाली नाही. रंगनाथ पठारे यांनी प्रास्ताविक तर कृष्णा किंबहुने यांनी स्वागतपर भाषण केले. संचालन कोमल ठाकरे यांनी केले.




उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. अभय बंग. शेजारी इतर मान्यवर

### प्रभाव नाकारण्याचा नाठाळपणा

चार्ली चॅप्लिन यांच्यासारखे अनेक कलावंत, विचारवंत गांधीजींच्या प्रभावाखाली होते. माझ्या पश्चात देशाचे नेतृत्व गांधी करतील हे लोकमान्य टिळकांनीही म्हटले होते. तत्वज्ञान, धर्मशास्त्र, समाजशास्त्र आणि अर्थकारण अशा अनेक क्षेत्रावर त्यांचा प्रभाव होता. हा प्रभाव नाकारण्याचा नाठाळपणा काही लोक करतात, अशा शब्दात ज्येष्ठ संपादक व विचारवंत सुरेश द्वादशीवार यांनी गांधीविरोधकांचा समाचार घेतला. या कार्यक्रमाचे बिजभाषण करताना ते बोलत होते.


लोकसत्ता Sun, 15 September 2019
https://epaper.loksatta.com/c/43595775

लोकमत

**संडे अँकर । सुरेश द्वादशीवार : 'महात्मा गांधी आणि मराठी साहित्य' द्विदिवसीय चर्चासत्राचे उद्घाटन**

# महाराष्ट्रात गांधींना न्याय देणारा न्यायाधीश निपजला नाही

## नागपूर गांधी विचार आणि विरोधकांचे कुरुक्षेत्र -अभय बंग

नागपूर हे गांधी विचार आणि गांधीविरोधकांचे कुरुक्षेत्र आहे. या क्षेत्रावर ८० वर्षे गांधी विचाराच्या काँग्रेसचे वर्चस्व राहिले आणि आता गांधींचा विरोध करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गड असल्याचे प्रतिपादन अभय बंग यांनी केले. महाराष्ट्रातील वैचारिक आणि ललित वाङ्मय क्षेत्रात गांधी दिसत नाहीत. ढोबळमानाने मराठी लेखकांनी गांधींची सुरुवातीला उपेक्षा केली, मग उपहास केला, नंतर उग्र विरोध केला आणि सरतेशेवटी गांधींचा खून करुन मोकळे झाल्याची टीका बंग यांनी मराठी साहित्यिकांबाबत केली.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर** : मराठी विचारकांनी जेवढा अन्याय महात्मा गांधींवर केला, तेवढा अन्याय इतर कुठेही झालेला नाही. मार्क्सवाद, समाजवाद, हिंदुत्ववाद, आंबेडकरवाद आणि खुद्द गांधीवाद्यांच्या अवडंबरात अडकलेल्या गांधीविचारांना न्याय देण्याची किमया महाराष्ट्रातील लेखकांना साधता आली नाही. खरं सांगायचे तर महाराष्ट्रात गांधींना न्याय देणारा एकही न्यायाधीश आजवर निपजला नसल्याची व्यथा लोकमत नागपूरचे संपादक सुरेश द्वादशीवार यांनी आज येथे व्यक्त केली.

साहित्य अकादमी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभाग व गांधी विचारधारा विभागाच्यावतीने शंकरनगर येथील गांधीभवन येथे आयोजित 'महात्मा गांधी आणि मराठी साहित्य' या विषयावरील द्विदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटन सोहळ्यात बीजभाषण करताना द्वादशीवार यांनी वैचारिक विभागणी असलेल्या महाराष्ट्रातील लेखकांची महात्मा गांधी यांच्याबाबतीतल्या भूमिकेवर प्रकाश टाकला. यावेळी साहित्य अकादमी मुंबईचे प्रादेशिक सचिव कृष्णा किबहुने, मराठी सल्लागार मंडळाचे संयोजक रंगनाथ पठारे, प्रसिद्ध संशोधक डॉ. अभय बंग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सिद्धार्थविनायक काणे, गांधी विचारधारा विभागप्रमुख प्रमोद वाटकर, डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित होते.



उद्घाटन सत्रात बोलताना अभय बंग, व्यासपीठावर कृष्णा किबहुने, रंगनाथ पठारे, डॉ. सिद्धार्थविनायक काणे, प्रमोद वाटकर.

जगपातळीवरील सर्वच क्षेत्रात महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. सबंध गुजरातेतील साहित्यावर गांधींचा प्रभाव दिसून येतो. मात्र, गांधींना ओळखण्याचे जे सामर्थ्य लोकमान्य टिळकांमध्ये, विन्सेट चर्चिलमध्ये म्हणा वा अन्य पाश्चात्य जाणकारांमध्ये होते, ते सामर्थ्य महाराष्ट्रातील लेखकांमध्ये दिसून आले नसल्याची खंतही द्वादशीवार यांनी बोलून दाखविली. याला कारण म्हणजे, गांधींनी स्वत:चे विचार सूत्रबद्ध पद्धतीने कुठेच लिहून ठेवलेले नाही. माझे जीवन हीच माझी विचारपद्धती, असे त्यांचे म्हणणे होते. मार्क्सवादाचा पराभव गांधींनी लेनिनच्या हयातीतच केला.

कामगार व शेतकऱ्यांचा विचार प्रबळ करणारा मार्क्सवाद भारतातील कामगार व शेतकऱ्यांनी गांधी विचारांमुळे नाकारला. समाजावाद्यांनी हवा तेवढा गांधी मंजूर करून, इतर तत्वे नाकारली. हिंदुत्ववाद्यांनी गांधीला फाळणीस जबाबदार धरुन, मुस्लिमप्रेम म्हणून गांधींचा विरोध केला. तर, आंबेडकरवाद्यांनी गोलमेज परिषदेमध्ये गांधींनी स्वत:ला सबंध भारतीयांचा मी एकटाच प्रतिनिधी असल्याचे संबोधल्याने, गांधींचा विरोध केला. मात्र, एक कुटुंबप्रमुख म्हणून गांधींनी सगळ्यांना कुरवाळल्याचे द्वादशीवार म्हणाले.

लोकमान्य टिळकांनी स्वत: महात्मा गांधी यांना काँग्रेसचे पुढचे नेतृत्व म्हणून पुढे केले होते. मात्र, त्या काळातील लेखक सवर्णीय विशेषत: ब्राह्मण वर्गातील असल्याने, प्रारंभी ते लोकमान्य

## नुसते गांधी नको, शिवाजी आणि सावरकरही हवेत -सिद्धार्थविनायक काणे

गांधी एक स्वभावधर्म आहे आणि तो प्रत्येकातच वसतो. मात्र, नुसते गांधी होऊन चालणार नाही तर, कधी शिवाजी महाराज तर कधी सावरकरही व्हावे लागेल, अशी भावना डॉ. सिद्धार्थविनायक काणे यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केली. महाराष्ट्रातील लेखकांनी गांधींवर चिंतन केले नाही, असे म्हणणे चुकीचे असल्याचेही ते म्हणाले. गांधींबद्दल लिहिणे म्हणजे गांधी विचार आत्मसात केला, असे होत नाही... असे चिंतनही त्यांनी व्यक्त केले. टिळक, नंतर सावरकर आणि पुढे संघाच्या प्रभावातच राहिले आणि गांधी आपसुकच नाकारल्या गेला. एकूणच गांधींना समजण्याच्या चक्रात ब्राह्मण, सावरकर आणि संघ अडथळा बनल्याचे ते म्हणाले. संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले, तर आभार प्रमोद वाटकर यांनी मानले.

# गांधींचे तत्त्वज्ञान मुस्लीम-आदिवासी अभ्यासकांपर्यंत पोहोचलेच नाही

## विद्यापीठाच्या चर्चासत्रातील सूर

**प्रतिनिधी, नागपूर**

**महात्मा गांधी** यांनी प्रत्येक समाजाचा विचार करून तत्त्वज्ञान मांडले. परंतु त्यांचे विचार आदिवासी आणि मुस्लीम अभ्यासक आणि साहित्यिकांपर्यंत पोहचले नाही. या विषयावर अभ्यासक व संशोधकांनी संशोधन केले पाहिजे, असा सूर गांधी विचारधारा आणि मुस्लीम व आदिवासी या साहित्य या विषयावरील चर्चासत्रात व्यक्त झाला.

सहित्य अकादमी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवशी रविवारी जावेद पाशा कुरेशी व प्रभू राजगडकर यांनी या चर्चासत्रात आपले विचार मांडले. अध्यक्षस्थानी मराठी सल्लागार मंडळाचे संयोजक रंगनाथ पठारे होते.

जावेद पाशा म्हणाले, महात्मा गांधी आणि मुस्लीम मराठी साहित्य समजून घेत असताना इतिहासाचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. भारतीय मुस्लिमांच्या बाबतीत अनेक गैरसमज आहे. मुस्लिमांच्या इतिहासाचे वास्तव आणि मुस्लिमांप्रती महात्मा गांधींची तत्कालीन स्थितीच्या संदर्भात असलेली भूमिका स्पष्टपणे मांडली गेली पाहिजे. प्रभू राजगडकर म्हणाले, आदिवासी साहित्यिकांना गांधी विचारांची प्रत्यक्ष प्रेरणा का मिळाली नसेल, हा अभ्यासाचा विषय आहे. गांधी विचारधारा आणि आदिवासी साहित्याचा काही संबंध असेल नसेल पण या दिशेने शोध घेतला तर नक्की काही तरी गवसण्याची शक्यता आहे.

ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत वानखडे यांच्या अध्यक्षतेत 'गांधी विचारधारा आणि दलित व स्त्रीवादी साहित्य' या चर्चासत्रात डॉ. सुनील रामटेके यांनी दलित साहित्याचा वेध घेताना डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या विचारांमधील वर्णव्यवस्था व जाती व्यवस्थेवर प्रकाश टाकला. गीताली म्हणाल्या, स्त्रीवादी चळवळीची भूमिका व्यक्त करताना स्त्रीयांनी महात्मा गांधींच्या विचारांना साथ दिली असली तरी स्त्रीवादी चळवळ धर्म या संकल्पनेने ती अपुरी ठरते. त्यानंतर राजन गवस यांच्या अध्यक्षतेत झालेल्या 'महात्मा गांधी आणि बालसाहित्य' या चर्चासत्रात लीला शिंदे व डॉ. मंगला वरखेडे यांनी आपले निबंध सादर केले.

लोकमत

# समतामूलक आणि तत्त्वनिष्ठ समाजासाठी गांधी सर्वदूर पोहचवा

## 'महात्मा गांधी आणि मराठी साहित्या'वरील चर्चासत्राचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** महात्मा गांधी यांनी एका समाजासाठी किंवा एका देशासाठी कार्य केले नाही. त्यांचे विचार अखिल मानवतेसाठीचे होते आणि त्यांना संपूर्ण विश्व अपेक्षित होता. ते स्वत:ला सनातनी हिंदू म्हणवत असले तरी, त्यामागची भूमिका सुधारणेची होती. धार्मिक अवडंबराला नव्या धर्मस्थापनेने मारता येत नाही. तर, त्या अवडंबराचा नि:पात करण्यासाठीचे प्रयत्न, त्याच धार्मिक अवडंबराचा शोध घेऊन आणि उपाय शोधून करता येतो, असे त्यांना वाटत होते. म्हणून, या महात्म्याला वादात अडकवण्यापेक्षा त्यांचे विचार आत्मसात करा. समतामूलक आणि तत्वनिष्ठ समाज घडण्यासाठी गांधी विचार सर्वदूर नि:पक्षपातीपणे पोहोचविण्याचे आवाहन सर्व विचारकांनी एकसाथ केले.

साहित्य अकादमी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गांधी विचार विभागातर्फे आयोजित द्विदिवसीय सर्चासत्राचा समारोप रविवारी झाला. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'गांधी विचारधारा आणि मुस्लिम व आदिवासी साहित्य' या विषयावरील चर्चासत्रात जावेद पाशा कुरैशी व प्रभू राजगडकर यांनी सहभाग घेतला. महात्मा गांधी आणि मुस्लिम मराठी साहित्य समजून घेताना इतिहासाचा आढावा घेणे गरजेचे असल्याची भावना पाशा यांनी व्यक्त केली. भारतीय मुस्लिमांबाबतचे गैरसमज दूर करून, महात्मा गांधी यांनी तत्कालीन स्थितीनुसार घेतलेल्या भूमिका मांडल्याशिवाय महात्मा गांधी यांचे महत्त्व लक्षात येणार नाही, असे ते म्हणाले. तर, प्रभू राजगडकर यांनी आदिवासी साहित्याचा वेध घेत, त्यात महात्मा गांधी कुठेच दिसत नाही. असे असतानाही आदिवासींच्या साहित्यात अहिंसा कमालीची भरलेली दिसत असल्याचे ते म्हणाले. गांधींनी संपूर्ण देशासाठी केले.. हे महत्वाचे आहे. असे असताना गांधी विचार आदिवासींपर्यंत का पोहोचले नाही... हा संशोधनाचा विषय असल्याचे राजगडकर यांनी स्पष्ट केले.



चर्चासत्रात बोलताना रंगनाथ पठारे, व्यासपीठावर प्रभू राजगडकर व जावेद पाशा कुरैशी.

चंद्रकांत वानखडे यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या 'गांधी विचारधारा आणि दलित व स्त्रीवादी साहित्य' या चर्चासत्रात डॉ. सुनील रामटेके यांनी दलित साहित्याचा वेध घेताना डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या विचारांमधील वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेवर प्रकाश टाकला. दोघांचेही कार्य राष्ट्रीय हिताचेच असतानाही, केवळ संभ्रमामुळे दोन्ही विचारांच्या अनुयायांमध्ये कमालीचे तेढ दिसून येण्याची कारणेही त्यांनी विशद केली. गीताली यांनी स्त्रीवादी चळवळीची भूमिका व्यक्त करताना... स्त्रियांनी महात्मा गांधींच्या विचारांना साथ दिली असली तरी स्त्रीवादी चळवळ धर्म या संकल्पनेने अपुरी ठरत असल्याचे सांगितले. जी पुरुषी सत्ता महिलांना नको, त्याच सत्तेचा आदर्शवाद धर्म या गांधींना अपेक्षित असलेल्या संकल्पनेत मांडल्या गेल्याने, कुठे तरी विसंगती दिसून येत असल्याचे सांगत, त्यांनी ही दरी कालांतराने दूर होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

तर, राजन गवस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या 'महात्मा गांधी आणि बालसाहित्य' या चर्चासत्रात लीला शिंदे व डॉ. मंगला वरखेडे यांनी निबंध सादर केले. महात्मा गांधी बालसाहित्यातूनच बालमनावर सकारात्मक परिणाम करणारा असून, त्यातूनच भविष्यवेधी विवेकशील पिढी निर्माण होईल.. अशी आशा या दोघांनीही व्यक्त केली.

# गांधीजींना कोता प्रतिसाद

## मराठी साहित्यिकांवर डॉ. अभय बंग यांची टीका; चर्चासत्रातून मंथन






चर्चासत्रात बोलताना डॉ. अभय बंग. व्यासपीठावर कुलगुरू डॉ. सिद्धार्थविनायक काणे, कादंबरीकार रंगनाथ पठारे, कृष्णा किंबहुने, प्रा. प्रमोद मुनघाटे, प्रमोद वाटकर आदींची उपस्थिती होती.

**म.टा.प्रतिनिधी**, नागपूर

'महात्मा गांधींसारख्या विराट आणि लोकोत्तर नेतृत्वाला मराठी साहित्यिकांनी दिलेला प्रतिसाद अत्यंत कोता होता. मराठी साहित्यविश्वाने गांधींची आधी उपेक्षा केली आणि नंतर उपहास व विरोध केला. विराट व्यक्तिमत्त्वाच्या महात्मा गांधींच्या जीवनातील अनेकविध पैलूंशी निगडित एकही महाकादंबरी किंवा महाकविता मराठी भाषेत निर्माण होऊ शकली नाही', अशी परखड टीका प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी केली.

साहित्य अकादमी, मराठी विभाग आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा गांधी विचारधारा विभाग यांच्यावतीने आयोजित 'महात्मा गांधी आणि मराठी साहित्य' या विषयावर आयोजित दोनदिवसीय चर्चासत्राचे उद्घाटक म्हणून डॉ. बंग बोलत होते. शंकरनगर येथील गांधी विचारधारा विभागाच्या गांधी भवन येथे शनिवारी हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. सिद्धार्थविनायक काणे होते. व्यासपीठावर साहित्य अकादमीच्या मराठी सल्लागार मंडळाचे संयोजक आणि कादंबरीकार रंगनाथ पठारे, साहित्य अकादमीचे प्रादेशिक सचिव कृष्णा किंबहुने, विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रा. प्रमोद मुनघाटे, गांधी विचारधारा विभागप्रमुख प्रमोद वाटकर उपस्थित होते. 'नागपूर ही गांधींच्या समर्थकांची आणि सन्माननीय विरोधकांची भूमी आहे. कोणत्याही भावनिक हिंदोळ्यात न अडकता महात्मा गांधींकडे आपण ऐतिहासिक नजरेतून शांतपणे बघू शकलो पाहिजे. गांधीजींचे भारतीय पटलावर येणे हे त्या विशिष्ट काळामुळे घडून आले. ३५ वर्षांत त्यांनी देशाचा चेहरा बदलून टाकला. त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत विराट होते. स्वातंत्र्ययुद्ध, गांधी आणि सावरकर, गांधींची आंदोलने, त्यांची विचारसरणी, त्यांच्याशी संबंधित विवाद आणि संघर्ष अशा अनेक बाबींवर ललित साहित्यकृती निर्माण होऊ शकल्या असता. गांधीजी मराठी नव्हते म्हणून की जातीने ब्राह्मण नव्हते म्हणून महाराष्ट्रात नाकारले गेले, याचा शोध घेतला गेला पाहिजे. आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या मोठ्या माणसांनी गांधींच्या विचारांविरोधात लिहिले. कारण गांधींचे तत्त्वज्ञान त्यांच्या विचारांपेक्षा वेगळे होते. मात्र, त्यांच्यावर अधिक लेखन का केले गेले नाही, हे आरशात तपासावे आणि पुन्हा मांडणी करावी', असेही डॉ. बंग म्हणाले. भांडवलवादाचे पाप, पृथ्वीचा वाढता ताप आणि धार्मिक शाप यांमध्ये अडकलेल्या जगाला गांधींची भूक आहे. त्यांची 'विश्वस्त' संकल्पना जगाने स्वीकारली आहे. त्यामुळे त्यांचे विचार आजही प्रासंगिक आहेत आणि त्यावर लेखन केले जावे, असाही आग्रह त्यांनी धरला. 'गांधीजीप्रमाणे शंभर टक्के वागणे कुणालाही शक्य नाही. खरेपणा, अहिंसा, साधेपणा याबाबत त्यांच्या अधिकाधिक जवळ जाण्याचा प्रयत्न आपण करू शकतो. हे प्रयत्न जितके जास्त होतील तितके आपल्यात गांधीजींची टक्केवारी वाढत जाईल. गांधीजीं सारख्या महापुरुषांचा सर्वांगाने विचार व्हावा. त्यातून येणारी मते-मतांतरे आदरपूर्वक स्वीकारली जावी आणि त्यांचा विचार वेचून काढला जावा', अशी अपेक्षा कुलगुरु डॉ. काणे यांनी व्यक्त केली.

### गांधींजींचा विचार तारकत्त्वाचा!

असुरक्षिततेमुळे माणसांमध्ये मारकत्वाचा विचार प्रबळ राहिला आहे. गांधीजींचा विचार हा तारकत्वाचा विचार आहे. गौतम बुद्ध किंवा महात्मा गांधी यांनी माणसांचा सुटा विचार केला नाही. त्याच्या अवतीभवतीच्या पर्यावरणाचा वेध घेत त्यांनी माणसांचा विचार केला आहे. आइन्स्टाइन आणि महात्मा गांधी यांच्यातही काही प्रमाणात साम्य होते. आइन्स्टाइनलाही कुणी पूर्वसुरी नव्हते आणि सत्याग्रहाच्या बाबतीत गांधीजींनाही कुणी पूर्वसुरी नव्हते. गांधींच्या आधी देशातील जनसामान्यांना स्वातंत्र्य आंदोलनाच्या केंद्रस्थानी आणण्याचे काम कुणी केले नव्हते. मात्र, याच गांधींना सर्वात पहिला विरोध महाराष्ट्रात झाला. विनोबा भावे आणि सानेगुरुजी यांच्यासारख्या मोजक्या लोकांनी त्यांचा विचार आत्मसात करून मराठीत लेखन केले. अस्वस्थतेच्या कड्यावर उभ्या असलेल्या विश्वाला येत्या काळात गांधीजींच्या विचारांची गरज भासणार आहे, असे मत रंगनाथ पाठारे यांनी यावेळी व्यक्त केले. उद्घाटन सत्राचे स्वागतपर भाषण साहित्य अकादमीचे प्रादेशिक सचिव कृष्णा किंबहुने यांनी केले. डॉ. कोमल ठाकरे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर गांधी विचारधारा विभागप्रमुख प्रमोद वाटकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे, गांधी अभ्यासक रामदास भटकळ, साहित्यिक वसंत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर, प्रफुल्ल शिलेदार, राजन गवस, मराठी विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे, गांधी अभ्यासक अपरूप अडावदकर, लेखिका अमृता इंदूरकर यांच्यासह अनेक मान्यवर, गांधीप्रेमी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# मराठी विचारवंतांनी केला बापूंवर अन्याय

## प्रा. सुरेश द्वादशीवार यांची बीजभाषणातून खंत; घेतला वेध



**म.टा. प्रतिनिधी**, नागपूर

'गुजराती साहित्य हे महात्मा गांधींच्या प्रभावाखाली होते. अनेक मान्यवर लेखकांसाठी गांधीजी गुरुस्थानी होते. मात्र, मराठी साहित्यिकांना त्यांचा जिव्हाळा वाटला नाही. मराठी विचारवंतांइतका अन्याय महात्मा गांधींवर कुणीही केला नाही', अशी खंत ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी व्यक्त केली. महात्मा गांधी आणि मराठी साहित्य या विषयावर आधारित चर्चासत्राचे बीजभाषण प्रा. द्वादशीवार यांनी केले. त्यावेळी त्यांनी महात्मा गांधींचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा प्रभाव आणि मराठी साहित्य या विषयावर विवेचन केले.

चार्ली चॅप्लिन यांच्यासारखे अनेक कलावंत, विचारवंत गांधींजींच्या प्रभावाखाली होते. माझ्या पश्चात देशाचे नेतृत्व गांधी करतील, हे लोकमान्य टिळकांनीही म्हटले होते. तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, समाजशास्त्र आणि अर्थकारण अशा अनेक क्षेत्रांवर त्यांचा प्रभाव होता. हा प्रभाव नाकारण्याचा नाठाळपणा काही लोक करतात. तो नाकारला जातो, याचे कारण गांधीविचार मूळ स्वरूपात पोहोचलेला नाही. शिवाय, गांधींजींनी त्याबद्दल स्वतः काही लिहून ठेवले नाही. आपला विचार पूर्णत्वास गेलाच नाही, असे त्यांचे म्हणणे होते. शिवाय, गांधीजींच्या विचारांच्या आकलनाबद्दल त्यांच्या निकटवर्तीयांमध्येही मतभेद होते. मार्क्सवादी, हिंदुत्ववादी आणि आंबेडकरवादी यांचा गांधींना प्रखर विरोध होता. शेतकरी आणि कामगार गांधींजींच्या मागे गेल्याने मार्क्सवादी त्यांचा राग करीत. समाजवादी त्यांच्या सोयीचे ठरतील, एवढेच गांधीजींचे विचार मानत असत. मुस्लिमांचा अनुनय आणि देशाची फाळणी असे दोन आरोप हिंदुत्ववादी करीत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामागे केवळ त्यांच्या जातीचे लोक उभे होते. या तीनही गटांपेक्षा जास्त भारतीयांसाठी महात्मा गांधी हेच नेते होते. गांधीजींनी टिळकांच्या पश्चात कार्यकर्त्यांना कार्यक्रम दिला आणि पक्षासाठी पैसाही उभा केला. त्यांच्या शब्दांत मंत्रशक्ती होती आणि त्यामागे आयुष्याची साधना होती, असे द्वादशीवार म्हणाले.

महाराष्ट्रातील बहुतांश ब्राह्मण लेखक हे लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि नंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे समर्थक होते. बहुजन लिहित होते, मात्र त्यांना लेखक म्हणून मान्यता नव्हती. गांधीजींवर लोकगीते होती; मात्र ती मुख्य साहित्य प्रवाहाचा भाग नव्हती. खांडेकर, माडखोलकर, पु. भा. भावे, आचार्य अत्रे यांचा गांधींना वैचारिक विरोध होता. नेहरू, पटेल, विनोबा यांच्यासारख्यांनी गांधींवर लिहिले, पण त्यांना कुणी साहित्यिक मानायला तयार नाही, असेही ते म्हणाले.

# मराठी साहित्यात महात्मा गांधींची उपेक्षाच

## डॉ. अभय बंग यांची खंत

**प्रतिनिधी, नागपूर**

भारतात महात्मा गांधी नावाचा एक महापुरुष होऊन गेला. परंतु मराठी साहित्यात त्यांच्या विविध पैलूंवर वैचारिक लेखनाचा अपवाद वगळता ललित व कांदबरी लेखन झाले नाही. एकप्रकारे मराठी साहित्यात महात्मा गांधींची उपेक्षाच झाली, अशी खंत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी व्यक्त केली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा मराठी विभाग, गांधी विचारधारा आणि साहित्य अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. सिद्धार्थ विनायक काणे, मराठी सल्लागार मंडळाचे संयोजक रंगनाथ पठारे, साहित्य अकादमी मुंबईचे प्रादेशिक सचिव कृष्णा किंबहुने, गांधी विचारधारा विभागाचे प्रमुख प्रमोद वाटकर, संयोजक डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित होते.

डॉ. बंग म्हणाले, खरे तर आपण महात्मा गांधी या विषयाकडे भावनिक हिंदोळ्यातून तटस्थपणे बघू शकलो पाहिजे. हा इतका मोठा महानायक कसा निर्माण झाला आहे याचा अभ्यास करण्याची व ते साहित्यातून समोर येण्याची गरज आहे. गांधी हे महानायक होते. ३५ वर्षात त्यांनी देशाचा चेहरा बदलून टाकला. मात्र मराठी साहित्य व गांधी याचा विचार करता साहित्यिकांचा प्रतिसाद मात्र अपुरा व पोरका दिसतो. मराठी साहित्यिकांनी सुरुवातीला गांधींची उपेक्षा केली. त्यानंतर उपहास व विरोध केला आणि शेवटी खून केला, असेही ते म्हणाले. कुलगुरू डॉ. काणे म्हणाले, वेगवेगळ्या परकीय भाषेतून महात्मा गांधीवर ५० पेक्षा अधिक पुस्तक लिहिली गेली आहेत. मात्र गांधींच्या वेगवेगळ्या पैलूंचा अभ्यास करुन ते साहित्यातून पोहचणे आवश्यक होते त्या प्रमाणात साहित्यनिर्मिती झाली नाही. रंगनाथ पठारे यांनी प्रास्ताविक तर कृष्णा किंबहुने यांनी स्वागतपर भाषण केले. संचालन कोमल ठाकरे यांनी केले.




उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. अभय बंग. शेजारी इतर मान्यवर

### प्रभाव नाकारण्याचा नाठाळपणा

चार्ली चॅप्लिन यांच्यासारखे अनेक कलावंत, विचारवंत गांधीजीच्या प्रभावाखाली होते. माझ्या पश्चात देशाचे नेतृत्व गांधी करतील हे लोकमान्य टिळकांनीही म्हटले होते. तत्वज्ञान, धर्मशास्त्र, समाजशास्त्र आणि अर्थकारण अशा अनेक क्षेत्रावर त्यांचा प्रभाव होता. हा प्रभाव नाकारण्याचा नाठाळपणा काही लोक करतात, अशा शब्दात ज्येष्ठ संपादक व विचारवंत सुरेश द्वादशीवार यांनी गांधीविरोधकांचा समाचार घेतला. या कार्यक्रमाचे बिजभाषण करताना ते बोलत होते.